# <u>वार्तापत्र</u>

कार्यालय पोलीस अधीक्षक
दिनांक ०२/०९/२०१७

दिनांक ३१/०८/२०१७ रोजी मिळालेल्या गुप्त बातमिदाराच्या खबरेवरुन मा. पोलीस अधिक्षक सो. यांच्या आदेशान्वये शासकिय वाहनाने चामोर्शी येथील मौजा फोकुर्डी येथे चारचाकी वाहन क्र. एम.एच.३३-ए-५६८० नि काही इसम अवैध दारु विक्री करीता वाहतूक करीत असल्याबाबतची गुप्त माहिती मिळाल्यावरुन अपर पोलीस अधिक्षक सो. गडचिरोली यांचे आदेशान्वये दारुबंदी पथक, स्थागुशा गडचिरोली येथील दारुबंदी पथकाने मौजा फोकुर्डी येथे सापळा रचला असता एकुण ७५१८४०/- रु. चा माल नामे १) मोशिन खॅान दिलदारखॅान पठान २) दिलीप बाबाजी चलाख ३) सोमेश्वर बालाजी गोहणे यांचे ताब्यातून जप्त करण्यात आला.

सदरचा अवैध विदेशी दारु चा माल शंकर सुखदेव रॉय रा. भिक्षी (माल) मालकीचा होता. शंकर सुखदेव रॉय हा अवैधरित्या विदेशी दारुचा माल चारचाकी वाहनाने वाहतुक करणार आहे, अशा खात्रीशिर खबरेवरुन मिळालेल्या माहितीच्या आधारे स्थागुशा गडचिरोली येथील दारुबंदी पथकाने चामोर्शी येथे पोहचुन नमुद चारचाकी वाहनाचा पाटलाग करुन फोकुर्डी योथे रोडचे कडेला वाहन थांबवुन दोन पंचा समक्ष प्रोव्हिबाबत सदर चारचाकी वाहनाची झडती घेतली असता चारचाकी वाहनामध्ये संशयितरित्या विदेशी दारुचे बॉक्स मिळून आला.

नमुद आरोपी नामे १) मोशिन खॅान दिलदारखॅान पठान २) दिलीप बाबाजी चलाख ३) सोमेश्वर बालाजी गोहणे ३) शंकर सुखदेव रॉय यांचे विरुध्द पोस्टे चामोर्शी येथे महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम कलम ६५ (अ), ९८ (क), ८३ अन्वये गुन्हा नोंद केला असून सदर गुन्हयाचा पुढील तपास पोस्टे चामोर्शी येथे चालू आहे.

सदरची कारवाई पोहवा/१४६१ नरेश सहारे, पोना/२२५२ उध्दव नरोटे, पोना/३०९२ दुधराम चवारे, मपोशि/१४५२ दुर्गा साखरे, चानापोशि/२९८६ प्रशांत पातकमवार यांनी केली आहे.

